# महात्मा गांधी यांचे महिला सबलीकरण विषयक विचार

**प्रा.डॉ. शीला धम्मपाल रत्नाकर,**प्रमुख मराठी विभाग,मालती वसंत दादा पाटील,कन्या महाविद्यालय, इस्लामपूर.

---

**प्रस्तावना -**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत सामाजिक सुधारणांचे श्रेय महात्मा ज्योतीरावफूले यांना जाते. ज्योतीरावांच्या बरोबर सावित्रीबाई फूले, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षिशाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, गोपाळ गणेशआगरकर, लोकहितवादी, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, महर्षि धोंडो केशव कर्वे, महात्मागांधी यांसारख्या महान विभूतींचा मोळाचा सहभाग होता. महात्मा ज्योतीराव फूले यांनीदीडशे वर्षापूर्वी स्त्री पुर्ष समानतेचा आणि सामाजिक न्यायाचा विचार मांडला. ९८४८मध्ये पुण्यामध्ये मुलींची पहिली शाळा काढून कृतीतही आणला.भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "दराईजअन्डफॉलऑफ हिंदू विमेन दी मेन' या पुस्तकात स्त्रायांना दास्यांच्या दरीत कसे लोटले याचेविश्लेषण केले आहे, त्यांच्या मते स्त्रियांच्या अवनीतीस पूर्ण मनूच जबाबदार आहे. मनुपूर्वकालखंडात स्त्रियांच्यावर लादलेले दुय्यमतेचे निर्बंध नष्ट करण्यासाठीच त्यांनी हिंदू कोडेबील लिहून स्त्रियांना न्याय, स्वातंत्र, समता आणि संरक्षण मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.स्त्रियांनी शिकावे, स्वाभिमानाने जगावे असा त्यांचा आग्रह होता. मनुस्मृतीने स्त्रियांचाउममर्द केला तिचा समाजात अनादर केला. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचेदहन केले आणि संपूर्ण स्त्री जातीच्या मुक्तीपर्यंत आपला विचार पोहचविला.महात्मा गांधीनी स्त्रियांच्या स्वातंत्र्याचाही आवर्जुन पुरस्कार केलेला आहे. स्त्री पुरूषतत्वता समान आहेत. स्त्रीला स्वत:चे असे स्वतंत्र असे व्यक्तिमत्व आहे. तिलापुरुषाइतकीच निसर्गाकडून मानसिक शक्तीची देणगी मिळालेली आहे. त्याग, शोषिकता,कष्टाळूपणा याबाबतीत स्त्रीया पुरुषांपेक्षा श्रेष्ठच ठरतात. अहिंसक झगडा करण्यास तीचअधिक लायक आहे. तिलाही पुरुषांडतकेच अधिकार असले पाहिजेत. स्त्री ही पुरुषाच्यामालकीची भोगवस्तू नाही. कटुंबातील व समाजातील आपले स्थान मिळविण्यासाठीस्त्रियांनी पुढे आले पाहिजे. असे गांधीजींना वाटते. यासाठी जे प्रयत्नशील राहिले.

**आईविषयी आदर -** गांधीजींना बाळपणांपासून आईचे चांगले संस्कार लाभले होते म्हणून ते म्हणतात."माझ्या स्मृतीपटलांवर माझ्या आईचा जो ठसठशीत संस्कार आहे तो म्हणजे ती एकमहान साध्वी होती. ती अत्यंत धर्मशील होती, चाणाक्ष, व्यवहारचतुर होती.''गांधीजींचेवडिल संस्थानात दिवाण म्हणून नोकरीस होते. ठाकूर साहेबांच्या मर्जीतील होते. आईला हीसंस्थानातील सगळया गोष्टींची माहिती असे आणि दरबारातील स्त्रियांना तिच्या हुशारीबद्दलफार आदर वाटे. गांधीजी लहानपणी पुष्कळ वेळा तिथे आईबरोबर जात असत. ठाकूरसाहेबांच्या विधवा मातोश्री बरोबर आईची चाललेली, रसरशीत चर्चा गांधीजी ऐकत असतत्यामुळे गांधीजींना आईविषयी नेहमी आदर वाटत असे. अशा आईवडीलांच्या पोटी २ऑक्टोबर ९८६५९ रोजी पोरबंदर उर्फ सुदामपुरी येथे गांधीजींचा जन्म झाला. त्यांचे बाळपणपोरबंदरलाच गेले. तिथेच त्यांना शाळेत घालण्यात आले.

**गांधीजींचा बालविवाह-** गांधीजीनी स्वत:च्या विवाहाची कहाणी सांगितलेली आहे. कठियाडमध्ये दोन स्वतंत्रविधी आहेत. एक वाड्निशचिय व दुसरा विवाह. दोन वाड्निशचिय म्हणजे वधुवरांच्यामातापितांनी त्यांचे लग्न करण्याबद्दल वचनबद्द होणे आणि वचन पाळललेच पाहिजे असेनाही. वराचा मृत्यू झाला तर वाड्निशचियामुळे वधू विधवा होत नाही. मातापित्यांनी केलेलातो करार असतो. मूलांवर तो बंधनकारकही नसतो. कित्येक वेळा त्यांना याची माहितीनसते. गांधीजींचा वाड्निश्चय तीन वेळा झाला होता, पण त्यांना त्याची माहिति नव्हती.त्यांना एवढेच कळले माझ्याकरिता नियुक्त केलेल्या दोन मुली मरण पावल्या त्यावरुनत्यांचा दोन वेळा वाड्निश्चय झाला. तिसरा सोयरिक ठरविण्याचा प्रकार वयाच्या सातव्यावर्षी झाला. याविषयी त्यांना फारसे आठवत नाही. वयाच्या तेराव्या वर्षी गांधीजींचा विवाहकस्तुरबाई यांच्याशी झाला. कस्तुरबा या समवयस्कर होत्या, पण शिकलेल्या नव्हत्या.स्वभाव साधा, स्वतंत्र वृत्तीच्या व निश्चयी होत्या. त्या गांधीजींशी फारसे बोळत नसतवडीलमंडळीसमोर तिच्याशी बोलण्याची, भेटण्याची, हिंमत नसल्यामुळे कस्तुरबाईंनाशिकविण्यास गांधीजींचे प्रयत्न अयशस्वी ठरले हे स्वत: गांधीजींनीच मान्य केले. म्हणूनचगांधीजींनी बाळविवाहा विरोधी कडाकडून टिका केली.

**बालविवाहाला विरोध-** गांधीजींनी बाळविवाहाळा विरोध केला, कारण भारतातील क्टंबव्यवस्था हीस्त्रियांच्या गुलामगिरीवर आधारलेली होती. स्त्रियांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य अधिकारनव्हते. स्त्री ही स्वातंत्र्याला लायक नाही. अशीच समजूत जुन्या शास्त्रकरांची होती. पतीशीएकनिष्ठपणे सेवा करणे, हाच पत्नीचा परमधर्म समजला जात असे. रुढीने स्त्रियांनाशिक्षणाचा अधिकार नाकारला होता. वयात येण्यापूर्वीच मुलीचे लग्न लावण्यात आलेपाहिजे असे शास्त्रात होते. परंपरेप्रमाणे स्त्रियांचे स्थान दुय्यम असल्यामुळे स्वतंत्रपणेधर्मकृत्ये करण्याची तिला मनाई होती. पुरुषांची सहधर्मचारिणी या नात्यानेच ती धर्मकृत्यातसहभागी होऊ शकत असे. पतीचे निधन झाल्यावर तिच्या हालअपेष्टाना पारावर नसे. सतीजाणे, केशवोपन करणे, सक्तीचे वैधव्य लादणे अशा चालोीींना धर्माचे अधिष्ठान होते.

१९१९ साली सूरतमधील ११ विधवांच्या आक्रोशाची दोन पत्रे गांधीजींना वाचायलामिळाली. त्यात त्यांनी आपली स्वत:ची नावे दिली होती पण आपल्या पालकांची नावे वपत्ते गुप्त ठेवलेली होती. त्यांनी स्वत:ची पूर्ण माहिती दिली नाही ही खंत व्यक्त करतानागांधीजी म्हणतात “या भगिनींच्या बाबतीत मला जर त्यांची नावे व पत्ते माहित असते तरअधिक माहितीसाठी मी चौकशी केली असती आणि त्यांच्या दु:खात पाठीशी उभीराहणारी माणसे शोधून काढली असती*" ही दोन पत्रे अपूर्ण असली तरी सर्वांना माहितीअसावी अशा सर्वसामान्य गोष्टीचा उल्लेख त्यांनी केळेला होता. त्या अकरा भगिनींपैकीतिघींना थोडेफार शिक्षण मिळालेले होते. बाकी अडाणी, निरक्षर होत्या, त्यापैकी एकीला“नवजीवन पत्रक कसेबसे वाचता येत होते. आपल्या समाजातील लोक त्यांना अभागीम्हणून दूर ठेवतात आणि 'पति-भक्षक' म्हणून त्यांची निंदा करतात. कोणत्या तरीमाणसांवर त्यांना अवलंबून रहावे लागते. त्यांचे शिक्षण तर शून्य, त्यांच्या अन्नात तूपसाखरेचा अंशही नसतो. सूरतमध्ये “वाणिक' समाजाच्या बेचाळीस जाती आहेत आणित्यामध्ये ७०० हून कमी विधवा नाहीत. धर्म काय आहे? हे कोणालाच कळत नाही, त्याम्हणतात “आम्हालाआमचाधर्ममाहितआहे, पण त्यांचे रक्षण करण्याची साधने आम्हालामिळत नाहीत. आम्हाला जर आश्रमात ठेवले आणि थोडेसे शिक्षण दिले, लोकांची सेवाकशी करावी हे शिकविले. तर विधवांचा धर्म पाळण्यास आम्ही तयार आहोत.

वरील दोन पत्रातील आशयावरुन गांधीजींनी हिंदू समाजापुढे काही निष्कर्ष ठेवलेआहेत. त्यापैकी एक निष्कर्ष पुढीलप्रमाणे “विवाहहाजरसंस्कारअसेलकिंवातसामानला गेला असेळ आणि तो जर शुध्द प्रीतीचे चिन्ह असेळ तर लहान मूलांचे लग्नकरणे, अनुरुप नसलेल्यांचे लग्न करणे, हे पाप समजले पाहिजे. पन्नास वर्षाच्या पुरुषानेनऊ वर्षाच्या मुलीशी लग्न करणे, चूक नसेळ तर आणि त्याबद्दल त्याला वाळीत टाकीतनसतील तर ती मुलगी विधवा झाल्यानंतर तिने पुन्हा विवाह केला असताना तिला वाळीतटाकणे किंवा अन्य प्रकारे शासन करणे, हे पाप होय.”हिंदूसमाजातअशाबालविधवांचीउदाहरणे अनेक आहेत. म्हणून गांधीजी भिन्न भिन्न जातींना उद्देशून म्हणतात, “जर काहीबालविधवांना पुनर्विवाह करावयाचा असेल तर त्यांना तुच्छ लेखू नका किंवा बहिष्कृत करुनका.”यावरुनगांधीजींची बाळविधवाविषयीची तळमळ लक्षात येते.

**महिला सक्षमीकरण -** गाधींजींनी आश्रमातील स्त्रियांना लिहिलेल्या पत्रावरुन व वेगवेगळया ठिकाणीस्त्रियांच्या सभेत दिलेल्या भाषंणावरुन गांधीजी स्त्रियांना सक्षम राहण्याचा आग्रह करतात.३९ ऑगस्ट ९९१९ मध्ये गांधीजींनी सूतकताई या विषयी 'दोहद' येथील स्त्रियांच्या सभेतस्वदेशी सुतकताईचे महत्व' याविषयावर भाषण केले. या सभेत शेकडो स्त्रिया उपस्थितहोत्या. या भाषणांतून धर्माचे रक्षण करणे हे स्त्रियांच्या हातात असते. भारताचा उद्धार हास्त्रियांच्या उन्नतीमध्ये आहे. आपल्या देशात सर्वात मोठ्या गरजा फक्त दोनच आहेत. अन्नव वस्त्र सुदैवाने आपण जे अन्न खातो ते आपल्या देशात तयार होते. पण जे वस्त्र आपणवापरतो ते बहुतेक सारे परदेशातून येते. गेल्या वर्षी परदेशांना साठ कोटी रुपये पाठविले,ही अत्यंत शरमेची गोष्ट आहे. या परिस्थितीतून मुक्त होणे हे आपले कर्तव्य आहे आणिते पार पाडण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे शंभर वर्षापूर्वी जे आपण केले तेच पुन्हा करणेमुख्यत: स्त्रियांनी सूतकताईचे काम करावे, आणि पुरुषांनी विणायचे करावे. कारण“सूतकताई हे सावकाश व शांतपणे करावयाचे काम असल्यामुळे त्यागाची मूर्तीमंथ प्रतिकअसलेल्या स्त्रियांच हे काम करण्यास आधिक लायक आहेत. चरखा हे जून्या काळीमुख्यत: स्त्रियांच्या हातातील उत्पन्नाचे साधन होते, परकीय मालकाच्या स्पर्धेमुळे

चरख्याचाऱ्हास झाला. अनेक क्टुंबावर उपासमारेची पाळी आली. कित्येक स्त्रियांना केवळ पोटासाठीआज शरमेचे जीवन जगावे लागत आहे. चरखाच या स्त्रियांचा वाली ठरेल. गरीब स्त्रियांनातो चरितार्थाचे साधन पुरवील. मध्यमवर्गीय स्त्रिया त्याच्या मदतीने कुटुंबाच्या पोषणालाहातभार लावू शकतील. विधवांचा तर तो कायमचा सोबती बनेल. आर्थिकदृष्टया सुस्थितीतअसणाऱ्या स्त्रियांनाही कर्तव्य म्हणून दररोज काही काळ सूतकताई केल्यास चरखा हानिरनिराळया थरातील स्त्रियांना एकत्र आणणारा दुवा बनेल"असेविचारमांडूनगांधीजींनीस्त्री दास्य विभोचनाच्या चळवळीची राजकीय आंदोलनाची सांगड घालून दिलेली आहे हेस्पष्ट दिसून येते.

**राजकारणात महिलांचा सहभाग-** लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर १९२० साली भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्वमहात्मा गांधीजींच्याकडे आले. गांधीजींच्या नेतृत्वामुळे आणि त्यांच्या प्रेरणेमुळे स्त्रियास्वातंत्र्य लढ्यात मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या. पण घरातील कामात अडकून पडलेल्यास्त्रिया मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या नाहीत. घरातील कामासाठी नोकर नेमण्याइतकीज्यांची ऐपत होती, अशा उच्च वर्गातील स्त्रियाच गांधीजींच्या चळवळीत आघाडीवर होत्या.मध्यमवर्गातील काही स्त्रियांनी अविवाहित राहून देशसेवेचा मार्ग पत्करला. आपल्या प्रत्येकसभेत गांधीजी स्त्रियांकडे वळून म्हणत "'माझ्या सत्य व अहिंसेवर आधारलेल्या यालढ्यात भाग घेण्यास तुम्ही समर्थ आहात. तुमची शक्ती जागृत झाली म्हणजे तुमच्यातसामर्थ्य येईल या सामर्थ्याचा देशात जी परकीय सत्ता इच्छेविरुद्ध जुलमाने राज्य करतेआहे. ती नाहिशा झाल्यावाचून रहाणार नाहीत. या देशाचे भवितव्य तुमच्या हातात आहे.पुरुषांच्या बरोबरीने कार्य करण्याची किंबहुना पुरुषांपेक्षा अधिक निष्ठेने कार्य करण्याचीशक्ती तुमच्यात आहे. यासाठी स्त्रीवर्गास जागृत करण्याची शिकस्त करा*' गांधीजींच्याआवाहनाला स्त्रियांनी मोठा प्रतिसाद दिला. कुटुंबातून विरोध असतानाही अनेक स्त्रियांनीचळवळीत सहभाग घेतला. सूतकताई, ग्रामोद्योग, कोर्तनाठ्वारे प्रबोधन अशा विधायककार्यकमात स्त्रियांचा सहभाग राहिला. भूमिगतांना मदत करणे, निरोप पोहचविणे, स्वातंत्र्यसैनिकांना जेवणाची व्यवस्था करणे, पत्रकांच्या नकला काढणे, अशा कामात स्त्रिया अग्रेसरराहिल्या. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री यांनी केळेळी कामगिरी लक्षणीय आहे.

**समारोप -** गांधीजीनी वारंवार आपल्या भाषणांतून, लेखातून, पत्रातून आश्रमातील व इतरमहिलांना सबळ बनविण्यासाठी त्यांच्याकडे जबाबदाऱ्या दिलेल्या आहेत. दारुबंदी वपरदेशी कपड्यावर बहिष्कार या दोन्ही कार्यकमाचे नेतृत्व स्त्रियांनीच करावे, असागांधीजींचा आग्रह होता. देशाच्या कल्याण्याच्या दृष्टीने हे कार्यकम महत्वाचे आहेत. दारु वइतर मादक द्रव्ये यांचे व्यसन लागले की, माणसाचा नैतिक अंधपात होतो. परदेशीकपड्याच्या आयातीमुळे लाखो कारागीर बेकार होऊन राष्ट्राचा आर्थिक पाया डळमळीतहोतो. या दोन्हींचे परिणाम घरांवर झाले खेरीज राहत नाहीत. घरातील स्त्रिया या अरिष्टालाबळी पडतात. स्त्रियांच्या बाबतीत अबला, भित्र्या इ. विशेषणे वापरण्यात येतात, ती तुम्हीखोटी ठरवावीत. गांधीजींचा वेगवेगळया देशाशी संबंध आल्यामुळे तेथील स्त्रिविषयी त्यांनामाहिती होती. आफ्रिकेतील निग्रो स्त्रिया मुळीच भित्र्या नाहीत. त्यांच्या भाषेत त्यांना लागूपडणारी विशेषणे कदाचित नसावीत. ब्रम्हदेशात पुरुष भित्रे व दुर्बळ आहेत. त्यामुळे स्त्रियासर्व प्रकारचा कारभार चालवितात. आश्रमातील स्त्रियांनी चोरांपासून व अन्य व्यक्तीपासूनस्वत:चे स्वत: संरक्षण केले पाहिजे. असे गांधीजीचे महिला सबलीकरणाविषयीचे असलेलेविचार स्त्री सामर्थ्य ब आत्मविश्वास वाढविणारे आहेत.

**संदर्भ:--**

१. महात्मा गांधीचे संकलित वाड्मय, खंड ३९, फेब्रुवारी १९२९, महात्मा गांधीसंकलित वाड्मय व मराठी भाषांतर समिती जुले १९६६, पृष्ठ क्र. ८

२. महात्मा गांधीचे संकलित वाड्मय, खंड १६, ऑगस्ट १९१९, जानेवारी ९९२०,संचालक प्रसिद्धी विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई, ३० जानेवारी ९९६८, पृष्ठ क्र.

३. महात्मा गांधी वाडूमय लेखसंग्रह--३३, जानेवारी, जून २०१६, पृष्ठ क्र. २६१९

४. पंडित नलिनी गांधी, गंथाली प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती २००६, पृष्ठ क्र.२२८.